**शासनाच्या नागरी वाहतूक धोरण (Urban Transport Policy) अंतर्गत नाशिक महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रासाठी अभियांत्रिकी संवर्गाच्या नव्याने निर्माण करण्यात आलेल्या Traffic Cell/ वाहतुक कक्ष करिता सेवेच्या सेवा प्रवेश नियमांस मान्यता देणे तसेच वाहतुक कक्षाकरिता पदे निर्माण करण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**नगर विकास विभाग**
**शासन निर्णय क्रमांक: नामपा-२०२४/प्र.क्र.०१/नवि-२५**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२**
**दिनांक : २७ फेब्रुवारी, २०२४**

वाचा :-
१) आयुक्त तथा प्रशासक नाशिक महानगरपालिका यांचे जा.क्र.आस्था /वशि/कार्या-१०/१५१/२०२३, दि.१५.१२.२०२३ रोजीचे पत्र
२) केंद्रीय नगरविकास मंत्रालय, परिपत्रक क्र.k-१४०९२/२५/२०१३-NURM दि.२४.१०.२०१३ (Comprehensive Mobility Plan)
३) नाशिक महानगरपालिका महासभा ठराव क्र.४९५, दि.१५.१२.२०२३
४) नाशिक महानगरपालिका (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गिकरण) नियम, दि.०६.०६.२०२३

**प्रस्तावना :-**

वाहतूक व्यवस्थेचे सुटसुटीत व सुरळीत नियोजन करणे व सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेकरिता आवश्यक पायाभूत सुविधा निर्माण करणे हे पालक संस्था या नात्याने नाशिक महानगरपालिकेचे आद्य कर्तव्य असून त्यामध्ये शहरासाठी आवश्यक पायाभुत सुविधा पुरविणे जसे की, Comprehensive Mobility Development (TOD) Parking, Island Beautification, Street furniture, Cycle Track, Footpath, Road Depo, Terminal, Shelters, MRT, Bridge, CD Work, Black spots कमी करणेबाबतच्या उपाय योजना, त्यानुषंगीक बांधकामे करणे, सार्वजनिक वाहतूक साधनांचा वापर करणेकरिता नागरीकांना प्रोत्साहीत करणेकरिता उपाययोजना करणे, गर्दीच्या वेळेनुसार मार्गक्रमणांमध्ये बदल सुचविणे, इ. अनेक प्रकारच्या वाहतुक विषयक समस्यावर उपाययोजना करणेकरिता नाशिक महानगरपालिकेत पुर्णवेळ वाहतुक कक्ष (Traffic Cell) कार्यरत असणे आवश्यक आहे.

आगामी काळात नाशिक व श्री. क्षेत्र त्र्यंबकेश्वर येथे सिंहस्थ कुंभमेळा २०२६-२७ पार पडणार असून त्याचे नियोजन व पायाभूत सुविधांचा आराखडा तयार करावयाचे कामकाज महानगरपालिका स्तरावर सुरू करण्यात आले आहे. कुंभमेळ्यासारख्या मोठया धार्मिक उत्सवाचे यशस्वी नियोजन करणे तसेच नाशिक शहराचे भविष्यातील वाढते क्षेत्रफळ व लोकसंख्या व त्याअनुषंगाने वाढत जाणारे खाजगी वाहन संख्या यामुळे सद्य:स्थितीत अस्तित्वात असलेल्या रस्त्यांवर मोठया प्रमाणात पडणारा ताण तसेच होणारी वाहतुककोंडी कमी करणेकरिता प्रभावीपणे उपाययोजना आवश्यक आहेत.

त्याअनुषंगाने शासनाच्या नागरी वाहतूक धोरण (Urban Transport Policy) अंतर्गत नाशिक महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रासाठी अभियांत्रिकी संवर्गाच्या नव्याने निर्माण करण्यात आलेल्या Traffic

Cell/वाहतुक कक्ष करिता सेवेच्या सेवा प्रवेश नियमांस मान्यता देणे तसेच वाहतुक कक्षाकरीता सदर पदे निर्माण करण्यास मान्यता मिळण्याबाबतचा प्रस्ताव संदर्भ क्र.१ अन्वये सादर करण्यात आला होता. त्याअनुषंगाने नाशिक महानगरपालिकेत पुर्णवेळ वाहतुक कक्ष (Traffic Cell) तयार करून त्याकरीता आवश्यक ८ पदे निर्माण करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

उपरोक्त प्रस्तावनेमध्ये नमूद केल्यानुसार शासनाच्या नागरी वाहतूक धोरण (Urban Transport Policy) अंतर्गत नाशिक महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रासाठी अभियांत्रिकी संवर्गाच्या नव्याने निर्माण करण्यात आलेल्या Traffic Cell वाहतुक कक्षाकरिता अभियांत्रिकी सेवेतील कार्यकारी अभियंता (वाहतुक नियोजन) १ पद, उपअभियंता (वाहतुक) १ पद, सहायक अभियंता (वाहतुक) २ पदे, कनिष्ठ अभियंता ४ पदे अशी एकूण ८ पदे निर्माण करण्यास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ५१ (४) नुसार तसेच सोबतच्या परिशिष्ट "अ" प्रमाणे सेवा प्रवेश नियमांस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५५ (१) नुसार शासन मान्यता देण्यात येत आहे.

| अ.क्र. | पदनाम | पदसंख्या | वेतनश्रेणी |
|---|---|---|---|
| १ | कार्यकारी अभियंता (वाहतुक नियोजन) | १ | एस-२३- ६७७००-२०८७०० |
| २ | उपअभियंता (वाहतुक) | १ | एस-२०- ५६१००-१७७५०० |
| ३ | सहायक अभियंता (वाहतुक) | २ | एस-१५- ४१८००-१३२३०० |
| ४ | कनिष्ठ अभियंता (वाहतुक व नियोजन) | ४ | एस-१४- ३८६००-१२२८०० |
| | एकूण | ८ | |

२. आयुक्त, नाशिक महानगरपालिका यांनी प्रस्तावित केलेल्या सेवा प्रवेश नियमांस शासन मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२४०२२६१८४१५८३७२५ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

( शंकर त्र्यं.जाधव )
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रती,

१. मा.मुख्यमंत्री महोदयांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
२. प्रधान सचिव (नवि-२) यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.
३. आयुक्त, नाशिक महानगरपालिका, नाशिक
४. निवड नस्ती (नवि-२५)

"C:\Users\vishal.kamble\Desktop\MAROTI\Regular note\२०२४\nashik\वाहतूक कक्ष.docx"

## परिशिष्ट अ
## वाहतुक नियोजन कक्ष (ट्रॅफिक प्लॅनिंग सेल)

| अ.क्र. | सेवा, संवर्ग | पदनाम व श्रेणी | पद संख्या | नेमणूकीची पध्दत व टक्केवारी १.नामनिर्देशन २.पदोन्नती ३.प्रतिनियुक्ती | नेमणूकी करीता अर्हता व नेमणूकीच्या पध्दती |
|---|---|---|---|---|---|
| १ | श्रेणी-१ अभियांत्रिकी सेवा | कार्यकारी अभियंता (वाहतुक नियोजन)<br><br>एस – २३ ६७७००-२०८७०० | १ | पदोन्नती १००% | अ) मान्यताप्राप्त विद्यापिठाची एम.ई. हायवे इंजिनिअरिंग/ एम.टेक ट्रान्सपोटेशन इंजिनिअरिंग.<br>ब)नाशिक महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील सेवाजेष्ठता व गुणवत्ता याआधारे मान्यताप्राप्त विद्यापिठाची उपरोक्त अभियांत्रिकी शाखेची पदवी धारण करणारे उपअभियंता या पदावरील कार्यरत संवर्गातुन.<br>क) महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई यांचेकडील अधिकृत MS-CIT परीक्षा उत्तीर्ण किंवा D.O.E.A.C.C. सोसायटीच्या अधिकृत C.C.C. किंवा O स्तर किंवा A. स्तर किंवा B. स्तर किंवा C. स्तर पैकी कोणतीही एक परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र.<br>ड) मराठी भाषेचे ज्ञान आवश्यक. |
| २ | श्रेणी-२ अभियांत्रिकी सेवा | उपअभियंता (वाहतुक )<br><br>एस – २० ५६१००-१७७५०० | १ | पदोन्नती १००% | अ) मान्यताप्राप्त विद्यापिठाची एम.ई. हायवे इंजिनिअरिंग/ एम.टेक ट्रान्सपोटेशन इंजिनिअरिंग.<br>ब) महानगरपालिकेच्या आस्थापने वरील सेवाजेष्ठता व गुणवत्ता याआधारे सहाय्यक अभियंता (वाहतुक नियोजन) या पदावरील. तसेच या संवर्गात पदोन्नतीने अधिकारी उपलब्ध न झाल्यास स्थापत्य अभियांत्रिकी मधील (बी.ई. सिव्हील) या अभियंता संवर्गामधुन निवड करता येईल.<br>क) महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई यांचेकडील अधिकृत MS-CIT परीक्षा उत्तीर्ण किंवा D.O.E.A.C.C. सोसायटीच्या अधिकृत C.C.C. किंवा O |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | स्तर किंवा A. स्तर किंवा B. स्तर किंवा C. स्तर पैकी कोणतीही एक परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र.<br>ड) मराठी भाषेचे ज्ञान आवश्यक. |
| ३ | श्रेणी – २ अभियांत्रिकी सेवा | सहा. अभियंता (वाहतुक)<br><br>एस – १५ ४१८००-१३२३०० | २ | नामनिर्देशन ५० % | अ) मान्यताप्राप्त विद्यापिठाची एम.ई. हायवे इंजिनिअरिंग/ एम.टेक ट्रान्सपोटेशन इंजिनिअरिंग.<br>ब) शासकीय/ निमशासकीय/ स्थानिक स्वराज्य संस्था / खाजगी संस्था येथे किमान ०३ वर्ष उपरोक्त अभियांत्रिकी कामाचा अनुभव.<br>क) महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई यांचेकडील अधिकृत MS-CIT परीक्षा उत्तीर्ण किंवा D.O.E.A.C.C. सोसायटीच्या अधिकृत C.C.C. किंवा O स्तर किंवा A. स्तर किंवा B. स्तर किंवा C. स्तर पैकी कोणतीही एक परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र.<br>ड) मराठी भाषेचे ज्ञान आवश्यक. |
| | | | | पदोन्नती ५० % | अ)नामनिर्देशनासाठी विहित केलेली शैक्षणिक अर्हता धारण कर्मचाऱ्यांमधून नाशिक महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील सेवाजेष्ठता व गुणवत्ता या आधारे नाशिक महानगरपालिकेच्या कनिष्ठ अभियंता या संवर्गातुन तसेच या संवर्गात पदोन्नतीने अधिकारी उपलब्ध न झाल्यास स्थापत्य अभियांत्रिकी मधील (बी.ई. सिव्हील - पदवी/ पदविका) या कनिष्ठ अभियंता या संवर्गातून.<br>क)व्यावसायिक परिक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक<br>ड)महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई यांचेकडील अधिकृत MS-CIT परीक्षा उत्तीर्ण किंवा D.O.E.A.C.C. सोसायटीच्या अधिकृत C.C.C. किंवा O स्तर किंवा A. स्तर किंवा B. स्तर किंवा C. स्तर पैकी कोणतीही एक परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र.<br>इ) मराठी भाषेचे ज्ञान आवश्यक. |
| ४ | श्रेणी-३ अभियांत्रिकी सेवा | कनिष्ठ अभियंता (वाहतुक नियोजन) एस-१४ ३८६००-१२२८०० | ४ | नामनिर्देशन ७५ % | अ) मान्यताप्राप्त विद्यापिठाची एम.ई. हायवे इंजिनिअरिंग/ एम.टेक ट्रान्सपोटेशन इंजिनिअरिंग.<br>ब) शासकीय/ निमशासकीय/ स्थानिक स्वराज्य संस्था / खाजगी संस्था येथे किमान ०३ वर्ष उपरोक्त अभियांत्रिकी कामाचा अनुभव.<br>क) महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण मंडळ, |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | मुंबई यांचेकडील अधिकृत MS-CIT परीक्षा उत्तीर्ण किंवा D.O.E.A.C.C. सोसायटीच्या अधिकृत C.C.C. किंवा O स्तर किंवा A. स्तर किंवा B. स्तर किंवा C. स्तर पैकी कोणतीही एक परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र.<br>ड) मराठी भाषेचे ज्ञान आवश्यक. |
| | | | | पदोन्नती<br>२५ % | अ) नामनिर्देशनासाठी विहित केलेली शैक्षणिक अर्हता धारण कर्मचाऱ्यांमधून नाशिक महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील सेवाजेष्ठता व गुणवत्ता या आधारे नाशिक महानगरपालिकेच्या सहाय्यक कनिष्ठ अभियंता या संवर्गातुन तसेच या संवर्गात पदोन्नतीने अधिकारी उपलब्ध न झाल्यास स्थापत्य अभियांत्रिकी मधील (बी.ई. सिव्हील - पदवी/ पदविका) या अभियंता संवर्गामधुन निवड करता येईल.<br>ब) नामनिर्देशनाने अर्हता धारण करणाऱ्या तांत्रिक (स्थापत्य) सेवेच्या कार्यरत कर्मचाऱ्यांमधून संबंधित पदावर किमान ०३ वर्षाचा अनुभव असणे आवश्यक<br>क) व्यावसायिक परिक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक<br>ड) महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई यांचेकडील अधिकृत MS-CIT परीक्षा उत्तीर्ण किंवा D.O.E.A.C.C. सोसायटीच्या अधिकृत C.C.C. किंवा O स्तर किंवा A. स्तर किंवा B. स्तर किंवा C. स्तर पैकी कोणतीही एक परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र.<br>इ) मराठी भाषेचे ज्ञान आवश्यक. |